हॅलो प्रभात

# डॉ.जे.जे.मगदूम फार्मसीच्या विद्यार्थ्यांची कोर्श इनोव्हेशन सेंटरला भेट

जयसिंगपूर : हॅलो प्रभात




डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेजच्या तृतीय वर्ष बी.फार्म. विभागातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी हैदराबाद येथील जर्मनीस्थित बहुराष्ट्रीय कंपनी कोर्श इनोव्हेशन सेंटर येथे शैक्षणिक औद्योगिक भेट दिली. या भेटीचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना औषधनिर्मिती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व औद्योगिक प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता.

या भेटीदरम्यान संस्थेच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून कंपनीची ओळख, जागतिक स्तरावरील कार्य तसेच टॅब्लेट उत्पादन तंत्रज्ञानातील योगदान याबाबत सविस्तर माहिती दिली. तज्ज्ञांनी सादरीकरणाद्वारे टॅब्लेट कॉम्प्रेशन तंत्रज्ञान, औषध उत्पादन प्रक्रिया आणि मोठ्या प्रमाणावर उत्पादनामध्ये आधुनिक यंत्रणांची भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांना टॅब्लेट कॉम्प्रेशन मशीन व कम्पॅक्शन सिम्युलेटर यांसारख्या अत्याधुनिक उपकरणांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. यामुळे ओरल सॉलिड डोसज (OSD) उत्पादनातील विविध टप्प्यांची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता आली. तसेच, तांत्रिक सत्रामध्ये टॅब्लेट उत्पादनातील प्रक्रिया ऑप्टिमायझेशन, गुणवत्ता नियंत्रण मापदंड आणि औद्योगिक अडचणी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तज्ज्ञांशी संवाद साधून आपल्या शंकांचे निरसन केले. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना आधुनिक औषधनिर्मिती प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण पद्धती तसेच औद्योगिक मानके व सुरक्षितता यांची सखोल माहिती मिळाली. शैक्षणिक ज्ञान आणि औद्योगिक प्रत्यक्ष अनुभव यामधील दुवा निर्माण करण्यास ही भेट अत्यंत उपयुक्त ठरली.

या औद्योगिक भेटीचे आयोजन ट्रेनिंग अँण्ड प्लेसमेंट ऑफिसर श्री. विनोद पाटील यांनी केले. यासाठी संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हा.चेअरपर्सन ॲड. डॉ. सोनाली मगदूम, कार्यकारी संचालक डॉ. सुनिल आडमुठे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.